# ‘गुगली’ ; पंडित बंधू बीडमध्ये आले अन् जयदत्त क्षीरसागर गेवराईत गेले

## नगरपालिका राजकारण : विधानसभेत विजयसिंह पंडितांना केली होती मदत



माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांचे गेवराईत स्वागत करताना भाजप नेते माजी मंत्री बदामराव पंडित आणि बाळराजे पवार.

### जयदत्त क्षीरसागर यांचे राजकीय भूमिकेबाबत अजूनही मौन

राष्ट्रवादी, शिवसेनेकडून मंत्री राहिलेल्या जयदत्त क्षीरसागर यांनी अद्यापही या निवडणुकीत भूमिका स्पष्ट केलेली नाही. विधानसभेतही त्यांनी शेवटच्या काही दिवसांत पुतण्या डॉ. योगेश यांना साथ दिली होती. पण आताही ते मौन बाळगून असल्याने त्यांचे कार्यकर्ते संभ्रमात आहेत.
बीडमध्ये पुन्हा एकदा पुतण्या डॉ. योगेश क्षीरसागर यांची राजकीय प्रतिष्ठा पणाला लागली आहे. ते यावेळी भाजपामध्ये आहेत. त्यामुळेच जयदत्त क्षीरसागर हे विधानसभेप्रमाणे उघड साथ देतात की, लोकसभेप्रमाणेच अंधारातून चक्रे फिरवतात, याकडे लक्ष लागले

### दादा म्हणाले, टोपी घालणार नाही

बीडच्या राजकारणातील भीष्माचार्य’ म्हणून ओळखल्या जाणाऱ्या शिवाजीराव पंडित यांनी जाहीरपणे एक शपथ घेतली होती. जोपर्यंत दिवंगत नेते अंकुशराव टोपे आणि दिवंगत केशरबाई क्षीरसागर यांचा पराभव घडवून आणत नाहीत, तोपर्यंत डोक्यावर टोपी घालणार नाहीत. तेव्हापासून पंडित आणि क्षीरसागर कुटुंबात राजकीय मतभेद आहेत. कधी गोड तर कधी कटू हे देखील पाहायला मिळालेले आहे.

### जुनी पोस्ट सोशल मीडियावर व्हायरल

विधानसभा निवडणुकीत जयदत्त क्षीरसागर यांनी विजयसिंह पंडित यांची भेट घेतली होती. सोबत आ. धनंजय मुंडे, डॉ. योगेश क्षीरसागरही होते. तेव्हा त्यांनी ’आण्णांनी आशीर्वाद दिले’, असे लिहिले होते. आता तोच फोटो घेऊन सध्या भाजपामध्ये असलेले माजी मंत्री बदामराव पंडित यांचा मुलगा युद्धजीत पंडित यांनी तो पोस्ट केला आहे. यावर त्यांनी पंडित भावंडांना ’झुकले पण, केले पण’ असे म्हणत डिवचले आहे.

बीड । दिव्य न्युज

नगरपालिका निवडणुकीत रोज राजकीय घडामोडीही वेगाने घडत आहेत. बीड पालिकेत पहिल्यांदाच पंडित बंधूनी राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे नेतृत्व हाती घेत एन्ट्री केली. यामुळे डॉ. योगेश क्षीरसागर यांनी पक्षाला सोडचिठ्ठी देत भाजपात प्रवेश केला. त्यानंतर आता रविवारी माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी गेवराईतील भाजपाच्या उमेदवार गीता पवार यांचे पती बाळराजे पवार व माजी मंत्री बदामराव पंडित यांच भेट घेत राजकीय गुगली टाकली. याच क्षीरसागरांनी विधानसभा निवडणुकीत पवार आणि बदामराव यांना विरोध करत आ. विजयसिंह पंडित यांना पाठिंबा दिला होता. पण आता चित्र पालटल्याने राजकीय समीकरणेही बदलू शकतात.

बीड पालिकेवर आतापर्यंत माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर, डॉ. भारतभूषण क्षीरसागर यांचेच वर्चस्व राहिले आहे. परंतु, मागील काही दिवसांपासून क्षीरसागर कुटुंबात राजकीय मतभेद झाल्याने संदीप क्षीरसागर वेगळे झाले आणि त्यांनी काका जयदत्त आणि चुलतभाऊ डॉ. योगेश यांचा पराभव करत दोनदा आमदारकीचा गुलाल उधळला. परंतु, त्यांना पालिकेवर राज्य करता आले नाही. आता यावेळीही ते पूर्ण ताकदीनिशी मैदानात उतरले आहेत.

परंतु, दुसऱ्या बाजूला डॉ. भारतभूषण क्षीरसागर यांच्या आजारपणामुळे मुलगा डॉ. योगेश क्षीरसागर व सून सारिका क्षीरसागर यांनी निवडणूक हाती घेतली. ते आतापर्यंत अजित पवार गटाचे बीड मतदारसंघात नेतृत्व करत होते. परंतु, उमेदवारी अर्ज दाखलच्या २ दिवस आधीच त्यांनी वारंवार डावलले जात असल्याचे कारण देत भाजपात प्रवेश केला. त्यामुळे अजित पवार गटाचे बीडमधील नेतृत्व पहिल्यांदाच माजी आ. अमरसिंह पंडित आणि आ. विजयसिंह पंडित यांच्याकडे आले.

# सत्ता असो वा नसो, आम्ही बीडमधील विकासकामे कधीच थांबू दिली नाहीत–मा.मंत्री जयदत्त क्षीरसागर





बीड । दिव्य न्युज

शहरातील पेठ बीड परिसरातील व्यंकटेश मंगल कार्यालयात सोमवारी (दि.२४) सायंकाळी आयोजित व्यापक कॉर्नर बैठकीला माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांच्या उपस्थितीमुळे सभेचे स्वरूप प्राप्त झाले. कार्यकर्ते व नागरिकांच्या उत्साहात झालेल्या या बैठकीत क्षीरसागर यांनी भारतीय जनता पार्टीच्या नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार डॉ.ज्योती रवींद्र घोमरे (घुंबरे) तसेच सर्व नगरसेवक पदाच्या उमेदवारांना प्रचंड बहुमताने विजयी करण्याचे आवाहन केले.

पुढे बोलताना माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर म्हणाले, सत्ता असो वा नसो, आम्ही बीडमधील विकासकामे कधीच थांबू दिली नाहीत. विकासकामांसाठी सक्षम आणि योग्य नेतृत्वाची गरज असते. म्हणूनच नगराध्यक्ष पदासाठी डॉ. ज्योती घुंबरे यांना उमेदवारी देण्यात आली आहे. भाजप उमेदवारांच्या माध्यमातून हा विकास नियोजित दृष्टीकोनासह निश्चितपणे पुढे जाईल. पेठ बीड भागातील जनतेने आम्हाला नेहमीच सातत्याने पाठबळ दिले आहे. आम्ही ज्या–ज्या उमेदवारांना उमेदवारी दिली आहे, ते सर्व सक्षम असून जनतेचे मूलभूत प्रश्न निश्चितच सुटतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. यावेळी प्रभाग क्र. ३ चे उमेदवार अमृत सारडा, कु. अश्विनी गोरख मोमीन; प्रभाग क्र. ४ चे प्रेम चांदणे, सौ. मीनाताई अशोक जाधव; प्रभाग क्र. ५ मधील श्रीमती मीनाबाई रणजितसिंह चौहान, प्रकाश कानगावकर; तसेच प्रभाग क्र. १६ चे उमेदवार परसराम जाधव व सौ. मुक्ता बाबूलाल ढोरमारे उपस्थित होते. यासोबतच परिसरातील भाजपचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून भाजप उमेदवारांना उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

### जयदत्तअण्णांचा आशीर्वाद आमच्या पाठीशी : डॉ.योगेश क्षीरसागर

जयदत्तअण्णा क्षीरसागर यांचा आशीर्वाद आमच्या पाठीशी आहे. त्यांनी दाखवलेल्या समाजकारण व राजकारणाच्या मार्गावरच आम्ही चालत आहोत. आगामी काळात बीड नगरपरिषदेच्या माध्यमातून विकासाचा अनुशेष भरून काढला जाईल, त्यासाठी भाजपच्या सर्व उमेदवारांना विजय करा. आपले प्रश्न सोडवण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत, अशी ग्वाही डॉ.योगेश क्षीरसागर यांनी दिली आहे.

### जयदत्तअण्णांमुळे प्रचाराला हत्तीचे बळ आले : डॉ.ज्योती घुंबरे

माजी मंत्री जयदत्तअण्णा क्षीरसागर यांच्या पाठिंब्यामुळे आमच्या प्रचाराला हत्तीचे बळ मिळाले आहे. भाजप विकासाचे व्हिजन समोर ठेऊन निवडणुकीला सामोरे जात आहे. बीड शहराच्या सर्वांगीण विकासासाठी माझ्यासह भाजपच्या सर्व नगरसेवक पदाच्या उमेदवारांना बहुमतांनी निवडून द्यावे, असे आवाहन डॉ.ज्योती घुंबरे यांनी केले आहे.

# जिंतूरशहरात उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या आगमनानिमित्त भव्य सत्कार

जिंतूर/दिव्य न्युज

जिंतूर नगरपरिषद निवडणूक २०२५ च्या निमित्य जाहीर सभेसाठी राज्याचे उपमुख्यमंत्री श्री अजित दादा पवार हे दिनांक २४ नोव्हेंबर रोजी सकाळी ११ वाजता राष्ट्रवादी काँग्रेसच्या प्रचारार्थ सभेसाठी आले असता त्यांचे जंगी स्वागत प्रभाग क्रमांक १२ उमेदवार सुलेमान निजाम सिद्दिकी मित्र मंडळ व अहेमद बागबान यांच्या वतीने जिंतूर येथील बलसा रोड कॉर्नर वर जेसीबी द्वारे मोठा हार टाकून भव्य स्वागत करण्यात आले या वेळी ऍड संजय माणिकराव भांबळे, न्याजुलाला, पृथ्वीराज प्रमोद भांबळे, व सुलेमान सिद्दीकी मित्र मंडळ चे युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# जे ठाकरे बंधू आरोप करायचे, तेच आरोप करण्याची शिंदे गटावर वेळ

मुंबई । दिव्य न्युज

राज्यात सध्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीची धामधूम पहायला मिळत आहे. या निवडणुकीपूर्वी शिवसेना ठाकरे गटासह विरोधी पक्षांनी मतदार याद्यांमधील गोंधळाचा मुद्दा उपस्थित केला होता. अशातच आता शिवसेना शिंदे गटावरही असा आरोप करण्याची वेळ आली आहे. कल्याण डोंबिवली महानगरपालिकेचे माजी सभापती विकास म्हात्रे यांनी २२ नंबरच्या प्रभागात मतांची आदलाबदल झाल्याचा आरोप केला आहे. याबाबत सविस्तर माहिती जाणून घेऊयात.

**डोंबिवलीत ४५०० मतदार दुसरीकडे हलवले**

कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या प्रभाग क्रमांक २२ मधील भाजपमधून शिवसेनेत गेलेल्या माजी सभापती आणि माजी नगरसेवकांनी देखील निवडणूक अधिकारी आणि कर्मचाऱ्यांवर गंभीर आरोप केले आहेत. माजी सभापती विकास म्हात्रे यांनी त्यांच्या प्रभाग क्रमांक २२ मधील ४५०० मतदार दुसरीकडे हलवले असल्याचा आरोप करत निवडणूक अधिकाऱ्यांविरोधात न्यायालयात जाण्याचा इशारा दिला आहे.

यावर बोलताना विकास म्हात्रे यांनी म्हटले की, ‘प्रभाग क्रमांक २२ मधील ४५०० मतदार इतर पॅनलमध्ये हलवले आहेत. प्रभागाच्या सीमावर्ती भागातील नावे हलली असती तर आम्ही मान्य केले असते, पण प्रभागाच्या मध्यभागातील साडेतीन हजार पेक्षा जास्त मतदारांची नावेच दुसरीकडे कशी गेली? यात नक्कीच काहीतरी घोळ आहे.

# नेत्यांसाठी स्वच्छता ‘शो’ ; फक्त दादा येणार म्हणून रस्ते चकाचक

## बीड शहरातील तात्पुरत्या स्वच्छतेमुळे ’नेत्यांना दाखवण्यासाठीच’ काम : नागरिकांत संताप

बीड । दिव्य न्युज

उपमुख्यमंत्री अजित पवार हे नगरपालिका निवडणुकीच्या प्रचारासाठी सोमवारी बीडमध्ये येणार असल्याने, शहरातील पालिका प्रशासनाला अचानक ’स्वच्छतेची’ आठवण झाली आहे. एरव्ही कायम गल्ली–बोळात कचरा, मुख्य रस्त्यांवर ढिगारे आणि तुंबलेल्या नाल्यांनी बकाल दिसणारे बीड शहर सध्या स्वच्छ केले जात आहे. प्रशासनाच्या या ’नाकर्तेपणावर’ नागरिकांमध्ये रोष व्यक्त होत आहे.

अजित पवार यांनी यापूर्वी बीड दौऱ्यावर असताना स्टेडियम परिसरातील अस्वच्छता आणि रस्त्यांच्या स्थितीवरून पालिका व जिल्हा प्रशासनाचे कान टोचले होते. त्यानंतर दुसऱ्याच दिवशी जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी स्वतः भेट देऊन काम करण्याचे निर्देश दिले होते. याच अनुषंगाने, या परिसरातील जुनी मुतारी तोडण्यात आली होती. मात्र, त्या कामाला दोन महिन्यांपासून पूर्णविराम लागला आहे. काम रखडल्यामुळे त्या जागेवर पुन्हा कचरा साचला असून, मुतारी नसल्याने लोक उघड्यावरच लघुशंकेसाठी जात आहेत. पालिकेच्या या उदासीनतेमुळे झालेला हा प्रकार अजित पवारांना पुन्हा दिसणार नाही, यासाठी सध्या तत्काळ मोहीम हाती घेण्यात आली आहे.

### नागरिकांच्या प्रश्नांवर भावी लोकप्रतिनिधी गप्प !

नगरपालिका निवडणुकीचा प्रचार सुरू असला तरी, नगराध्यक्ष आणि नगरसेवकपदाचे अनेक भावी उमेदवार सध्या शहराच्या ज्वलंत प्रश्नांवर मौन बाळगून आहेत. शहराची अस्वच्छता, पाण्याची समस्या किंवा अंतर्गत राजकीय वादावर ही ते बोलत नाहीत. सत्ता मिळवण्याची इच्छा असलेले हे नेते निवडणुकीच्या रणधुमाळीत ही नागरिकांच्या प्रश्नांकडे दुर्लक्ष करत असल्याची टीका आता सुरू झाली आहे.

### अजित पवार जाताच पुन्हा बकाल अवस्था

थांबवून, शहरातील नागरिकांना अजित पवार शहरातून निघून गेले की, पुन्हा शहराची बकाल अवस्था होते, हे अनेकदा सिद्ध झाले आहे. त्यामुळे, ही स्वच्छता नागरिकांसाठी नसून, केवळ नेत्यांना दाखविण्यासाठीच आहे की काय, असा प्रश्न नागरिक उपस्थित करत आहेत. प्रशासनाने हा दिखावा नियमित आणि शाश्वत स्वच्छता सेवा द्यावी, अशी मागणी होत आहे.



ज्या जिल्हा स्टेडीयम परिसरातील रस्ता आणि अस्वच्छतेवरून उपमुख्यमंत्री अजित पवारांनी प्रशासनाचे कान टोचले होते. तोच रस्ता पवार येणार असल्याने बीड नगर पालिकेच्या स्वच्छता कर्मचाऱ्यांकडून सोमवारी सकाळी -सकाळी स्वच्छ केला जात होता.

## १ लाख रूपयांच्या आत संपत्ती असलेले ४ उमेदवार, ५ लाखापर्यंत ६ जण

# बीडच्या रिंगणामध्ये ३ कोट्यधीश उमेदवार; डॉ.घुंबरे सर्वात श्रीमंत





**चौघांची संपत्ती २० लाखांपर्यंत तर दोघांची ५० लाखांपर्यंत**




बीड । दिव्य न्युज

बीड नगराध्यक्ष पदासाठी प्रथमच एससी महिला नगराध्यक्षासाठी राखीव सुटले आहे. १९ उमेद्वार रिंगणात असून भाजप उमेदवार डॉ. ज्योती घुंबरे सर्वात श्रीमंत उमेदवार आहेत. त्यांची संपत्ती तब्बल ७ कोटी १५ लाख १८ हजार ९३४ रुपये आहे. अपक्ष उमेदवार राधिका शिवाजी मुने या १ कोटी २८ लाख १९ हजार ६४६ रुपयांच्या मालकीण आहेत. राष्ट्रवादी शरद पवार गटाच्या स्मिता विष्णू वाघमारे यांच्याकडे १ कोटी १९ लाख ७९ हजार ३९८ रुपयांची एकूण मालमत्ता आहे. अपक्ष लढणाऱ्या रजनी कांबळे यांच्याकडे एक रुपयाचीही मालमत्ता नाही. उमेदवारांनी दाखल केलेल्या शपथपत्रातून त्यांच्या व पतीच्या व कुटुंबाच्या नावे असलेल्या मालमत्तेची ही माहिती समोर आली आहे.

### १ कोटी व त्यापेक्षा अधिक संपती असणारे उमेदवार; जमीन, घर, शेतीचा समावेश

डॉ. ज्योती घुंबरे यांच्याकडे २२ लाख ९६ हजार ५७४ जंगम मालमत्ता आहे. यात, तर जमीन, घर, शेती अशा ११ प्रॉपर्टी आहेत. २ कोटी ६५ लाख २१ हजार रुपये आहेत. त्यांच्या पतीकडे रोख ५ लाख ४० हजार ६१० रुपये, वाहने २३ लाख ५२ हजार अशी एकूण ३० लाख २६ हजार ३६० रुपये जंगम मालमत्ता असून एकूण कुटुंबीयांची मालमत्ता : ७ कोटी १५ लाख १८ हजार ९३४ रुपये आहे. अपक्ष राधिका मुनेयांची संपत्ती १ कोटी २८ लाख १९ हजार असून राष्ट्रवादीच्यास्मिता वाघमारे यांची मालमत्ता ७ लाख ५३ हजार आहे. तर पतीकडे १७ लाख २५ हजारांची मालमत्ता आहे. अन्य काही स्थावर मालमत्ता असून १ कोटी १९ लाख ७९ हजारांची संपत्ती आहे.

### १ लाखाच्या आतील संपती असलेले उमेदवार

रजनी अर्जुन कांबळे : ०, कोमल रजनीकांत वाघमारे : ६५ हजार, मंगल अशोक थोरातः ४६ हजार २००, सुरेखा हर्ष शृंगारे : ३० हजार रुपये.

### डॉ. घुंबरेंवर २ कोटींचे कर्जही

डॉ. ज्योती घुंबरे यांच्यावर २ कोटी २० लाख ६८ हजार ३६४ रुपये कर्ज आहे. राधिका मुने यांच्यावरही ८ लाख २६ हजारांचे कर्ज आहे. संगीता वाघमारे यांच्याकडे कर्ज ६४ हजार रुपये कर्ज आहे. करुणा मस्के यांच्याकडेही २ लाख २२ हजार देणे आहे.

### १ लाख ते ५ लाख संपती असलेले उमेदवार, पाच जणींचा समावेश

सुषमा जोगदंड : १ लाख ९६ हजार, प्रियंका वडमारे : २ लाख २५ हजार रुपये, दिव्या स्वामी : १ लाख ४० हजार, विद्या पवार : २ लाख ७ हजार, वृषाली जायभायेः १ लाख ३८ हजार ५०० रुपये, तोळणाबाई गोरे : १ लाख ३७ हजार

### अशी आहे निवडणूक खर्चाची मर्यादा

बीड पालिका ही अ वर्ग दर्जाची पालिका असल्याने अध्यक्ष पदाच्या उमेदवाराला १५ लाखांची खर्च मर्यादा आहे. तर नगरसेवक पदाच्या उमेदवाराला ५ लाख रुपये खर्च मर्यादा आहे. केलेला खर्च दररोज उमेदवारांना पालिकेत खर्च समितीकडे सादर करावा लागणार आहे.

### २१ लाख ते ५० लाख संपती असलेले उमेदवार

संगीता वाघमारेः ३१ लाख १५ हजार ४०० रुपये. सारिका विकास जोगदंड यांच्याकडे २६ लाख १ हजारांची मालमत्ता आहे.

**११ लाख ते २० लाख : हिराबाई कांबळे :** ११ लाख १२ हजार ५००, करुणा मस्के : ११ लाख ५ हजार ३००, प्रणिता पवारः १९ लाख हजार ६ हजार, राष्ट्रवादी काँग्रेसच्या प्रेमलता पारवे यांची मालमत्ता १५ लाख ५९ हजार ४४४ रुपयांची आहे.

# सर्वसामान्यांनीच घेतली निवडणूक हातात प्रभाग क्र.१७ मध्ये तुतारीची हवा





बीड । दिव्य न्युज

बीड नगर परिषदेची निवडणूक आता चांगलीच रंगात आली असून शहरातील प्रभाग क्र. १७ मध्ये नगराध्यक्ष, आणि दोन्ही नगरसेवकांची निवडणूक जनतेनीच हातात घेतली आहे. नगराध्यक्षपदासाठी अनुभव संपन्न उमेदवार सौ. स्मिता विष्णू वाघमारे आणि प्रभाग १७ अ मधील शेख शाकेर फकीर महम्मद आणि प्रभाग १७अ मधील सर्वसामान्य घरातील तरूण मुकुंद भोसले यांच्या पत्नी सौ. अमृता मुकुंद भोसले यांचा विजय सुकर होत चालला असून प्रभागात फक्त आणि फक्त तुतारीचीच हवा असल्याचे मतदारच बोलून दाखवत आहेत.

प्रभाग क्र. १७ मध्ये रविवारी (दि. २३ नोव्हेंबर) सकाळी रॅली संपन्न झाली. यावेळी मतदारांनी या प्रचार रॅलीला उत्स्फुर्त प्रतिसाद दिला. प्रभागामध्ये आता पर्यंत विकासाची खूप चांगली कामे झालेली आहेत. बीडचे आमदार संदीप क्षीरसागर यांचे प्रगाभागामध्ये चांगले लक्ष असून त्यांनी केलेल्या कामांची पावती म्हणूनच नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार सौ. स्मिता विष्णू वाघमारे, नगरसेवक पदाचे उमेदवार शेख शाकेर फकीर महम्मद आणि सौ. अमृता मुकुंद भोसले यांचे पारडे जड मानले जात आहे. विरोधकांकडे आता कुठलाच मुद्दा राहिला नसल्याने तुतारी फार्मात असल्याचे बोलले जात आहे. येणाऱ्या २ डिसेंबर २०२५ रोजी संपूर्ण शहरात तुतारीच वाजणार असा विश्वास सर्वांना आहे.

# प्रभाग क्र.२० मध्ये अपक्ष उमेदवार सय्यद मुजीब ए-वन व शेख पाशा यांचीच चर्चा

## उद्या मिळणार अधिकृत चिन्ह मग येईल प्रचारात रंगत







बीड । दिव्य न्युज

बीड शहरातील अत्यंत जुना भाग म्हणजे इस्लामपुरा हा प्रभाग अत्यंत प्रतिष्ठेचा आणि महत्वाचा आहे या प्रभागातून ४ टर्म नगरसेवक राहिलेले सय्यद मोहियोद्दीन उर्फ ए वन टेलर यांच्या कार्यकाळात झालेले विकास कामे आज ही लोकांच्या मनात घर करून आहे. ए-वन टेलर हे बीड नगरपालिकेत अनेक विषयाचे सभापती होते तर उपनगराध्यक्षपद ही त्यांनी भुषविला होता आता होत असलेल्या निवडणुकीत ए वन टेलर यांचे ज्येष्ठ चिरंजीव सय्यद मुजीब ए वन हे निवडणुकीच्या रिंगणात उतरले आहे.

त्यांच्या सोबत अ मधून शेख हाजराबी पाशा हे ही निवडणुकीत आहे अपक्ष उमेदवार असल्याने उद्या २६ नोव्हेंबर रोजी त्यांना अधिकृतरित्या निवडणूक विभागाकडून चिन्ह मिळणार आहे. सय्यद मुजीब यांचा या प्रभागात दांडगा जनसंपर्क असुन या प्रभागात त्यांच्या नातेवाईकांची मोठी संख्या आहे. मित्र परिवार आणि माननारा वर्ग या मुळे सय्यद मुजीब ए वन यांना या निवडणूकीत कोणतीच अडचण राहणार नाही येणारे २ तारखेला त्यांना मिळणारे चिन्हा समोरील बटन दाबण्यासठी मतदार वाटत पाहत आहे आता उद्या त्यांना चिन्ह काय मिळते याकडे प्रभागाचे लक्ष लागून आहे.

## राजकीय सभांना सुरुवात होत असल्याने रिक्षाच्या परवानगीसाठी न.प कार्यालयात गर्दी

# बीडच्या गल्ली बोळात फिरणार प्रचाराचा ९१८ वाहनांचा ताफा

बीड । दिव्य न्युज

बीड सध्या निवडणुकीची रणधुमाळी सुरू आहे. प्रचाराने वेग घेतला आहे. बीडमध्ये राजकीय पक्षांच्या सभांची लगबग सुरू आहे. प्रचार करणाऱ्या वाहनांना परवानगी घेण्यासाठी बीड नगर परिषद कार्यालयात वाहनांच्या मोठ्या रांगा लागत आहेत. नगराध्यक्ष तसेच नगरसेवक असे एकूण ३०६ उमेदवार रिंगणात आहेत. प्रत्येकाला तीन वाहनांची परवानगी दिली जाणार आहे. निवडणूक काळात तब्बल ९१८ वाहनांचा ताफा शहरातील गल्लोगल्ली फिरणार आहेत. बीड नगरपरिषद निवडणुकीच्या रिंगणात चुरस वाढली आहे. नगराध्यक्ष आणि नगरसेवक पदांसाठी एकूण ३०६ उमेदवार आपले नशीब आजमावत आहेत. अर्ज मागे घेण्याच्या मुदतीनंतर निवडणूक आयोगाने उमेदवारांची अंतिम यादी जाहीर केली आहे. आता प्रचाराने वेग घेतला आहे. मात्र, राष्ट्रीय आणि राज्य पक्षांच्या तुलनेत अपक्ष उमेदवारांना प्रचारासाठी अत्यंत कमी वेळ मिळणार आहे. त्यामुळे त्यांच्यात नाराजीचा सूर आहे.

दुसरीकडे, वाहन परवानगीसाठी निवडणूक कार्यालयात गर्दी सुरू आहे. प्रत्येक उमेदवाराला प्रचारासाठी प्रत्येकी ३ वाहनांच्या (एकूण ९१८ वाहने) परवानगीची मुभा देण्यात आली आहे. यासाठी नगरपरिषद कार्यालयातील निवडणूक विभागात स्वतंत्र कक्ष उभारण्यात आला आहे. निवडणूक अधिकाऱ्यांकडून परवानगी दिली जात आहे. विशेष म्हणजे वाहनांचे फिटनेस प्रमाणपत्र आणि आवश्यक कागदपत्रांची तपासणी आरटीओ विभागाचे अधिकारी कार्यालयातच करत आहेत. यामुळे उमेदवारांची धावपळ कमी झाली आहे. कागदपत्रांची पूर्तता करणाऱ्या वाहनांना तात्काळ स्टिकर दिले जात आहेत. प्रत्येक बाबीसाठी स्वतंत्र कक्ष देण्यात आला आहे. कामाची विभागणी करून नियोजन सुरू असल्याचे मुख्याधिकारी शैलेश फडसे यांनी सांगितले.



### अपक्षांना चिन्हांसह प्रचार करण्यासाठी हाती ३ दिवस

निवडणूक आयोगाच्या कार्यक्रमानुसार, अपक्ष उमेदवारांना त्यांच्या निवडणूक चिन्हांचे वाटप २६ नोव्हेंबर रोजी होणार आहे. चिन्हे मिळाल्यानंतर त्यांना मतदारांपर्यंत पोहोचण्यासाठी केवळ तीन दिवसांचा (२७, २८, २९ नोव्हेंबर) अवधी मिळणार आहे. ३० नोव्हेंबर रोजी सायंकाळी प्रचाराची मुदत संपणार आहे. पक्षांच्या उमेदवारांना त्यांची मूळ चिन्हे निश्चित असल्याने त्यांनी प्रचारात आघाडी घेतली आहे, तर अपक्षांना कमी वेळेत आपले चिन्ह मतदारांपर्यंत पोहोचवण्याचे मोठे आव्हान पेलावे लागणार आहे. दरम्यान, सध्या केवळ पक्षांच्या प्रचार वाहनांच्या परवानगीची लगबग सुरू असून अपक्षांच्या वाहनांची बुधवारनंतर पहायला मिळणार आहे.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक मोहम्मद अबुबकर यांनी माऊली ऑफसेट एमएसईबी ऑफीससमोर माळीवेस बीड येथे छापून सां.दिव्यवार्ता कार्यालय कोहिनूर बेकरीजवळ, इस्लामपुरा रोड, बाबा चौक, भालदारपुरा बीड येथे प्रकाशित केले. या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या व लेख यामधुन व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.वाद विवाद बीड न्यायालय अंतर्गत मो.९३७१२९१०४२, ९५४५३८१२२०, फोन नंबर : ०२४४२-२३१२२०, फॅक्स नंबर : ०२४४२-२३१२२०